**BEFORE THE NATIONAL GREEN TRIBUNAL,**

**WESTERN ZONE, BENCH AT PUNE**

Original Application No.112 /2023

01. MR. MAHESH SHANKARLAL SHANKARPELLI
Age: 52 years, Occupation: Social work
Add: Galli No.1, Ma Durga Niwas,
near Vitthal Rukmai Temple, Shastri Colony,
Sillod, Aurangabad-431112
Mob no. 8484999888
Email: mahesh.s.pelli@gmail.com

02. MR. SANJAY MANIKRAO NIKAM
Age: 45 years, Occupation: Social Work
Add: Near Gajanan Maharaj Temple,
At Kotnandra, Post- Talni, Taluka- Sillod,
District- Aurangabad- 431112
Mob No. 9765909154
Email: sn9630924@gmail.com

...APPLICANTS

Vs

01. CHIEF OFFICER
Sillod Municipal Council, Aurangabad
Sillod Municipal Council, Taluka Sillod,
District- Aurangabad-431112
Contact No. - 02430-222467
Email: - cosillod@gmail.com

02. DISTRICT COLLECTOR, AURANGABAD
V8VQ+G5V, Alamgir Colony,
Maulana Azad Research Centre Rd,
Collector Office Campus, Aurangabad, 431003
Contact No.: 02402331200
Email:-collector.aurangabad@maharashtra.gov.in

03. SUB-DIVISIONAL OFFICER, SILLOD
Behind Sillod Municipal Council, Mondha Road,

ATTESTED BY ME
15/12/23
Adv. Sachin K. Dhakre
NOTARY GOVT. OF INDIA

Sillod, Aurangabad-431112
Contact No.: 02430-222172
Email:-sdmsilld@gmail.com

04. TEHSILDAR, SILLOD
Near Sillod Bus stand, Teshil office Sillod,
Aurangabad -431112
Contact: 02430-222029
Email: - tahashildarsillod@gmail.com

05. MINISTRY OF REVENUE AND FOREST,
STATE OF MAHARASHTRA
THROUGH PRINCIPAL SECRETARY
Mantralaya, Mumbai-400032
Contact: 22024588
Email: - psec.revenue@maharashtra.gov.in

06. MINSTRY OF ENVIROMENT AND FOREST
THROUGH SECRETARY
Indira Paryavaran Bhawan Jorbagh Road,
New Delhi — 110 003
Contact: 01 1-20819308, 011-20819408
Email: - secy-moef@nic.in

07. MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD
Through its Chairman
Kalpataru Point, 3rd and 4th floor,
Opp. PVR Theatre, Sion (E), Mumbai-400 022
Contact: - 022 240 42418
Email: - chairman@mpcb.gov.in

08. CENTRAL POLLUTION CONTROL BOARD
Through its Chairman
Parivesh Bhavan, CBD-Cum Office Complex,
East Arun Nagar,
Delhi-110032
Contact - +91 11 22391035
E-mail: - ecb.cpeb@nic.in

ATTESTED BY NO...
15/12/23
Adv. Sachin K. Dhakre
NOTARY GOVT. OF INDIA
Reg.No. 1622E Sillod-431112 (M.S.)

09. DISTRICT MINING OFFICER, AURANGABAD
Alamgir Colony, Maulana Azad Research Center Road,
Collector office Campus,
Aurangabad -431003
Contact: - 9430829179 / 02402334501
Email: - dmo2016.aurangabad @ gmail.com

Respondent no.9 added and amendment
carried out as per the Order of the
Hon'ble NGT(WZ), Pune in I.A. no, 199/2023
dated 15/09/2023
Adv. for Applicants

...RESPONDENTS

AFFIDAVIT

I, Sayyed Rafiq Sayyed Kankar, Chief Officer, Sillod Municipal Council, Sillod, Tal. Sillod, Dist. Chh. Sambhajinagar (Aurangabad), do hereby state on solemn affirmation as follows:

1. I say that I am the Respondent No.1 in the above Original Application. Nothing in this Affidavit be treated as admission of something stated in the Original Application unless it is clarified, explained or otherwise answered. I may be permitted to file further Affidavit if the circumstances so require.

2. At the outset, I say that, I am law-abiding officers and I function independently. It is denied that I have the support of local MLA Abdul Sattar, who is also a Cabinet Minister.

ATTESTED BY ME
15/12/23
Adv. Sachin K. Dhakre
NOTARY GOVT. OF INDIA

The Applicants have made vague allegations without any foundation. The Applicants have not placed on record any evidence in support of their allegation. Nor the said Minister is impleaded as party to these proceedings. These proceedings are initiated due to political rivalry of the father of the Applicant and the said Hon'ble Minister.

3. I say that, on 23.03.2023 the Respondent No.1 applied to the Collector Chh. Sambhajinagar (Aurangabad) for reservation of riverbed for sand mining for 9 development works in Sillod city. On 29.03.2023, the Collector informed the Respondent No.1 that it should deposit an upset price of Rs.600 per brass. The said letter also informed the Respondent No.1 about the other charges. These letters are annexed to this Reply and marked as **ANNEXURE R-1** and **ANNEXURE 'R-2'.** Thereafter, the Respondent No.1 deposited the entire requisite amount towards royalty, District M. Fund, Stamp Duty, Survey Charges, Environmental Charges in the form of Bank guarantee, Security Deposit. Therefore, the Respondent No.2 granted permit to the Respondent No.1 for excavation of sand in the

ATTESTED BY ME
15/11/23
Adv. Sachin K. Dhakre
NOTARY GOVT. OF INDIA

permitted Gut. The said order dated 27.4.2023 is at **ANNEXURE 'R-3'** .

4. I say that after handing over the possession of allotted gut numbers, measurement of the excavated material was carried out. It revealed that, the excavation that was carried out was less than what was permitted. I have not committed breach of any of the conditions, subject to which mining permission was given. The documents produced by the Applicants are not reliable. This is clear from the Affidavit of the Tahsildar, Sillod.

5. In the light of the above, it is not necessary to appoint the Expert Committee and the Original Application may be dismissed with cost.

Hence, this Affidavit.

Place: Pune
Date: /12/2023

Deponent

Sayyed Rafiq Sayyed Kankar,
Chief Officer,
Sillod Municipal Council

NOTARY ... OF INDIA

ATTESTED BY ME
5/12/23
Adv. Sachin K. Dhakre
NOTARY GOVT. OF INDIA
Reg.No. 16225 Sillod-431112 (M.S.)

VERIFICATION

I, Sayyed Rafiq Sayyed Kankar, Chief Officer, Sillod Municipal Council, Sillod, Tal. Sillod, Dist. Chh. Sambhajinagar (Aurangabad), do hereby state on solemn affirmation that whatever stated in the above, is based upon the information derived from the official records, which I believe to be true and correct.

Solemnly affirmed here at __________ on this ___ day of December month of the year 2023

AFFIANT

Sayyed Rafiq Sayyed Kankar,
Chief Officer,
Sillod Municipal Council

Identified by me

Advocate

NOTARIAL

NOTARIAL

NOTARIAL

AFFIDAVIT
Solemnly affirmed before me
by Shri / Smt.
R/o
Dist.
who identified by
whom he/she personally knows.

ATTESTED BY ME
15/12/23.
Adv. Sachin K. Dhakre
NOTARY GOVT. OF INDIA
Reg. No. 1622 Sillod-431112 (M.S.)

MUNICIPAL COUNCIL SILLOD DIST. AURANGABAD

नगरपरिषद सिल्लोड जिल्हा औरंगाबाद

महावीर चौक, मुख्य रस्ता सिल्लोड - 431112

PhoneNo. 02430-222467 Fax : 02430-222560 Email id : cosillod@gmailcom

जा.क्र.नपसि/बांधकाम/2023/297

दिनांक-23.03.2023

प्रति,

मा. जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,
औरंगाबाद

**विषय : शासकीय कामांसाठी वाळू घाट राखीव ठेवणे बाबत.**

**संदर्भ** : शासन निर्णय क्रमांक गोखनि-10/1021/प्रक्र.82/ख-1दिनांक 28.01.2022.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय शासन निर्णय वाळू निर्गती सुधारीत धोरणानुसार केंद्र / राज्य शासनाच्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखालील सार्वजनिक प्राधिकरणांच्या प्रकल्प /योजनांकरीता त्यांच्या नामनिर्देशीत केलेल्या कोणत्याही अभिकरणाच्या नावे वाळू गट राखीव ठेवता येतील. अशा राखीव वाळू गटातून अशा प्रकल्पासाठी आवश्यक वाळूचा उत्खननाचा करीता जिल्ह्यातील संबंधीत शासकीय कामांच्या अंदाजपत्रकात नमुद केलेली वाळूची किंमत किंवा शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या वाळूच्या स्वामित्वधनाची रक्कम यापैकी जी रक्कम जास्त असेल त्या किमती नुसार अशा शासकीय कामांसाठी उपलब्ध करुन देण्यास कामाप्रमाणे मंजुर करण्याची मुभा जिल्हाधिकारी यांना राहील, अशी तरतुद आहे. त्यानुसार सिल्लोड नगरपरिषदेस या वर्षात खालील कामांसाठी अंदाजे 5900 ब्रास वाळूची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | कामाचेनाव | अंदाजेआवश्यकवाळू(ब्रास) |
|---|---|---|
| 01 | नगरपरिषद नवीन प्रशासकीय इमारत बांधकाम करणे | 1100 |
| 02 | नगरपरिषद प्रशाला बांधकाम भाग-1 | 400 |
| 03 | नगरपरिषद प्रशाला बांधकाम भाग-1 | 200 |
| 04 | वैशिष्ट्य पूर्ण योजना अंतर्गत शॉपिंग कॉम्प्लेक्स भाग-01 व 02 | 550 |
| 05 | हिंदु समाज स्मशानभूमि बांधकाम | 200 |
| 06 | साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत प्रस्तावित 07 कामे | 650 |
| 07 | आमदार फंड अंतर्गत प्रस्तावित 09 कामे | 200 |
| 08 | जिल्हा नगरोत्थान योजना अंतर्गत 08 प्रस्तावित कामे | 1250 |
| 09 | नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना अंतर्गत प्रस्तावित 11 कामे | 1350 |

602



सन २०२२-२०२३ या वर्षातील वाळू घाटातील वाळूसाठा शासकीय कामासाठी राखीव ठेवून राखीव वाळू साठ्यासाठी शासकीय विभागास भरणा करावयाच्या रकमेचा तपशील.

| क्र. | तालुका | वाळू घाटाचे/ वाळू साठ्याचे ठिकाण | नदीचे नाव | वाळू साठा (ब्रास मध्ये) | प्रती ब्रास किंमत | वाळू राखीव केलेल्या यंत्रणेचे नाव | प्रस्तावित स्वामित्वधनाची रक्कम | अनामत रक्कम बँक गॅरंटीच्या स्वरुपात स्वामित्वधनाच्या रकमेच्या २०% | जिल्हा खनिज प्रतिष्ठान DMF रक्कम स्वामित्वधनाच्या रकमेच्या १०% | मुद्रांक शुल्क कार्पेट प्राईज १० लाख पेक्षा जास्त असल्यास ०.२% | पर्यावरण शुल्क स्वामित्वधनाच्या रकमेच्या २% (बँक हमीच्या स्वरुपात) | भूजल सर्वेक्षण शुल्क | आयकर २.०६ (TCS) | भूपृष्ठ भाडे | जी.एस.टी. रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| १ | सिल्लोड | कोटनांद्रा | पुर्णा | ५८३० | ६०० | मुख्याधिकारी नगर परिषद सिल्लोड | ३४९८००० | ६९९६०० | ३४९८०० | ६९९६ | ६९९६० | ५००० | ७२०५९ | संबंधीत तहसिलदार यांचेकडून निश्चित करण्यात येईल. | प्रचलित नियमानुसार होणारी जी.एस.टी. रक्कम संबंधित विभागाकडे जमा करून पुरावा सादर करावा लागेल |

१. उक्त स्तंभ क्र. ०८ मध्ये नमुद स्वामित्वधनाची रक्कम संबंधीत तहसिलदार यांचेकडून Grass प्रणालीव्दारे चलन मंजूर करुन घेवून मु.ले. ०८५३ अलोहयुक्त खाणकाम व धातुशास्त्रीय उद्योग, गौणशिर्ष-१०२ खा.व.खनिज स्वामित्वधन, उपशिर्ष -१०२ (१) गौणखनिजापासून मिळणाऱ्या जमा रकमा, संगणक संकेतांक ०८५३००४१०१ या लेखाशिर्षाखाली शासनास जमा करुन चलनाची मुळ प्रत या कार्यालयास सादर करावी.
२. उक्त स्तंभ क्रं. ०९ मध्ये नमुद केलेली रक्कम राष्ट्रीयकृत बँकेच्या हमी (Bank Gurantee) पत्राच्या स्वरुपात या कार्यालयास सादर करावी.
३. उक्त स्तंभ क्रं. १० मध्ये नमुद जिल्हा खनिज प्रतिष्ठानची (DMF) रक्कम जिल्हा खनिज प्रतिष्ठान, औरंगाबाद या नावाने असलेल्या एस.बी.आय. बँक जुना मोंढा, रोकडा हनुमान कॉलनी औरंगाबाद येथील बँक खाते क्र. ३७५१९२२११६७ मध्ये जमा करुन बँक स्लिप या कार्यालयात सादर करावी.
४. उक्त स्तंभ क्रं. ११ मध्ये नमुद केलेली रक्कम मुद्रांक शुल्क रक्कम संबंधित तहसिलदाराकडून Grass प्रणालीव्दारे चलन मंजूर करुन घेवून मुख्य लेखाशिर्ष ००३०, Department -Inspector General Of Registration, Payment Type Non Judicial Stamps Duty on Unstamped or Insuff stampd doc IGR Mumbai संगणक संकेतांक ००३००५३५०१ या लेखाशिर्षाखाली शासनास जमा करावी.
५. उक्त स्तंभ क्रं. १२ मध्ये नमुद केलेली रक्कम राष्ट्रीयकृत बँकेच्या हमी (Bank Gurantee) पत्राच्या स्वरुपात या कार्यालयास सादर करावी.
६. उक्त स्तंभ क्रं. १३ मध्ये नमुद केलेल्या रकमेचा Senior Geologist, Groundwater Surveys and Development Agency, Aurangabad या नावाने धनाकर्ष या कार्यालयात जमा करावा.
७. उक्त स्तंभ क्रं. १४ मध्ये नमुद केलेल्या रकमेचा Treasury Income Tax Account, Aurangabad या नावाने धनाकर्ष या कार्यालयात जमा करावा.
८. उक्त स्तंभ क्रं. १५ मध्ये नमुद रक्कम संबंधीत तहसिलदार यांचेकडून शासन विहित दराने वाळू गटाच्या क्षेत्रफळानुसार परिगणित करण्यात आलेली भुपृष्ठ भाड्याची संपुर्ण रक्कम Grass प्रणालीव्दारे चलन मंजुर करुन घेवून लेखाशिर्ष ००२९ संकीर्ण संकेतांक ००२९१६७५०१ या लेखाशिर्षाखाली शासनास जमा करुन चलनाची मुळ प्रत या कार्यालयास सादर करावी.

मा.जि.अ.यांचे मान्यतेने

Ashinde 29/3/23

(आप्पासाहेब शिंदे)
निवासी उप जिल्हाधिकारी औरंगाबाद

| अ.क्र. | कामाचेनाव | अंदाजेआवश्यकवाळू(ब्रास) |
|---|---|---|
| | एकूण ब्रास | 5900 |

वरील कामांसाठी अंदाजपत्रकामध्ये वर नमुद केल्या प्रमाणे नियमानुसार वाळूची किंमत रु.672/- प्रती ब्रास (Royalty + Surcharge (2%) + Dist. Mineral Foundation Cess (10%)= 600+12+60=672) प्रमाणे नगरपरिषद मार्फत आगाऊ भरणा करण्यात येईल.

तरी वरील शासकीय कामांसाठी योग्य असलेला वाळूघाट राखीव ठेवण्यात यावा, ही विनंती.

आपला विश्वासू,

मुख्याधिकारी
नगरपरिषद सिल्लोड

ANNEXURE - 2

जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद
(खनिकर्म विभाग)
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, फाजलपुरा, औरंगाबाद
दुरध्वनी: ०२४०-२३३१५०१ (205) ई मेल :- dmo2016.aurangabad@gmail.com

जा.क्र. २०२३/मशाका-२/गौ. ख./कावि- ११० दिनांक :- २९/०३/२०२३.

प्रति,

मुख्याधिकारी,
नगर परिषद, सिल्लोड ता.सिल्लोड,
जि. औरंगाबाद.

विषय :- औरंगाबाद जिल्हयातील सन २०२२-२०२३ करिता पर्यावरण मान्यता प्राप्त वाळू घाट शासकीय कामासाठी राखीव ठेवणेबाबत वाळु घाटाची रक्कम भरणा करणेबाबत.

संदर्भ :-१. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई क्रमांक गौखनि १०/१०२१/ प्र.क्र.८२/ख-१, दिनांक २८.०१.२०२२.
२. आपले पत्र जा.क्र.नपसि/बांधकाम/ २०२३/२९७, दि. २३.०३.२०२३
३. राज्यस्तरीय पर्यावरण आघात निर्धारण प्राधिकरण यांचेकडील दिनांक ०९.०३.२०२३ रोजीची पर्यावरण मान्यता.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, आपले संदर्भीय क्रमांक २ अन्वये आपल्या कार्यालयाने कळविले आहे की, सिल्लोड नगरपरिषदेस या वर्षात ०९ कामांसाठी अंदाजे ५९०० ब्रास वाळूची आवश्यकता असल्याचे कळवून शासकीय कामांसाठी योग्य असलेला वाळूघाट राखीव ठेवण्यात यावा अशी विनंती केली आहे.

या अनुषंगाने संदर्भ क्र. ३ अन्वये औरंगाबाद जिल्हयातील सन २०२२-२०२३ करिता मौजे कोटनांद्रा ता. सिल्लोड ५८३० ब्रास या वाळू घाटास माहे ३० सप्टेंबर २०२३ पर्यंतच्या कालावधीसाठी पर्यावरण मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदर वाळू घाट आपल्या संदर्भीय क्रमांक ०२ पत्राच्या अनुषंगाने शासकीय कामासाठी राखीव ठेवण्यात येत असुन संदर्भीय क्रमांक ०१ शासन निर्णयातील तरतूदीनुसार हातची किंमत (अपसेट प्राईज) प्रती ब्रास रक्कम रुपये ६००/- मात्र असुन सदर किंमतीनुसार येणारी एकुण रक्कम व त्या अनुषंगाने इतर अनुषंगिक बाबींची तरतुद करुन सदरची संपुर्ण रक्कम एकाच वेळी दिनांक ३ एप्रिल, २०२३ अखेर शासन जमा सादर करण्यात यावी.

मा.मंत्री (महसूल), महाराष्ट्र राज्य यांच्याकडील दिनांक १६.०३.२०२३ रोजी झालेल्या Video Conference मधील सुचनेनुसार राखीव ठेवण्यात येणा-या वाळू गटातून नदीपात्रात निश्चित केलेल्या वाळू/रेतीगटातून वाळू/रेतीचे उत्खनन अयांत्रिकी पध्दतीने (Manual Method) करण्यात येईल याबाबत हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील.

हातची किंमत (अपसेट प्राईज) व त्या अनुषंगीक इतर बाबीची होणा-या रकमेची सविस्तर माहिती सोबतच्या तक्त्यात देण्यात आली आहे.

मा.जि.अ.यांचे मान्यतेने

A.Shinde
29/3/23
(आप्पासाहेब शिंदे)
निवासी उप जिल्हाधिकारी
औरंगाबाद

वाचा :- 01. वाळू / रेतीचे उत्खनन, साठवणूक व ऑनलाईन प्रणालीव्दारे विक्री याबाबतचे सर्वंकष धोरण शा.नि.क्र. गौखनि-10/1222/प्र.क्र. 82/ख-1 दिनांक 19.04.2023.

02. वाळू / रेती निर्गती धोरण दिनांक 28.01.2022.

03. मा. पर्यावरण सचिव, सदस्य, राज्यस्तरीय पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्र. SIA/MH/MIN/409355/2022 दिनांक 09.03.2023

04. मुख्याधिकारी, नगर परिषद, सिल्लोड ता.सिल्लोड जि.औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र. नपसि/बांधकाम/2023/297, दिनांक 23.03.2023.

05. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.2023/मशाका-2/गौ.ख./कावि- दि. 29.03.2023.

---

जा.क्र.2023/मशाका-2/गौख/कावि-161
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद
दिनांक :-27,एप्रिल,2023.

:: आ दे श ::

ज्याअर्थी, संदर्भीय क्रमांक 04 पत्रान्वये मुख्याधिकारी, नगर परिषद, सिल्लोड ता.सिल्लोड जि.औरंगाबाद यांनी सिल्लोड नगर परिषद अंतर्गत सिल्लोड शहरात या वर्षात 09 कामांसाठी अंदाजे 5900 ब्रास इतका वाळु असलेला वाळू घाट राखीव ठेवण्याबाबत विनंती केली होती.

त्याअर्थी ईकडील कार्यालयीन जा.क्र.2023/मशाका-2/गौ.ख./कावि-, दि. 29.03.2023 अन्वये मौजे कोटनांद्रा ता.सिल्लोड येथील 5830 ब्रास वाळू घाट सिल्लोड नगर परिषद अंतर्गत सिल्लोड शहरातील कामासाठी राखीव ठेवण्यात येत असल्याचे कळवून सदर वाळू घाटाची हातची किंमत (अपसेट प्राईज) प्रती ब्रास रक्कम रुपये 600/- प्रमाणे येणा-या रकमा व अनुषंगिक इतर रकमा शासन खाती भरणा करण्याबाबत कळविण्यात आले होते.

ज्याअर्थी, मौजे कोटनांद्रा ता. सिल्लोड जि. औरंगाबाद येथील पुर्णा नदी पात्रातील 5830 ब्रास वाळुची हातची किंमत रूपये 34,98,000/-(अक्षरी रक्कम रूपये चौतीस लाख अठ्ठयाण्णव हजार फक्त) इतकी असुन सदर वाळूघाटासाठी मुख्याधिकारी, नगर परिषद, सिल्लोड ता.सिल्लोड जि.औरंगाबाद यांनी चलनाव्दारे रक्कम रूपये 34,98,000/- अक्षरी रक्कम रूपये चौतीस लाख अठ्ठयाण्णव हजार फक्त) इतक्या भरणा केलेल्या मौजे कोटनांद्रा ता. सिल्लोड जि. औरंगाबाद येथील पुर्णा नदी वाळू घाटाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | वाळूघाटाचे नाव | तालुका | नदी | गट नंबर | वाळूघाटाचे आकारमान (मिटरमध्ये) | | | उपलब्ध वाळूसाठा (ब्रास मध्ये) | हातची किंमत (रूपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | लांबी (मी.) | रूंदी (मी.) | खोली (मी.) | | |
| 01 | कोटनांद्रा | सिल्लोड | पुर्णा | 137,140, 141,142, 143 | 550 | 30 | 1 | 5830 | 34,98,000/- |

ज्याअर्थी, या कार्यालयाचे पत्र जा.क्र.2023/मशाका-2/गौ.ख./कावि-, दि. 29.03.2023 अन्वये उक्त वाळूघाटापोटी रकमा दिनांक 11.04.2023 अखेर जमा करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार मुख्याधिकारी, नगर परिषद, सिल्लोड ता.सिल्लोड जि.औरंगाबाद यांनी वाळूघाटाची देय रकमा रूपये खालील प्रमाणे शासन जमा केलेली आहे.

| अ.क्र. | हातची किंमत (रूपये) | तपशिल | | दिनांक |
|---|---|---|---|---|
| 01 | 34,98,000/- | चलन क्र.MH000702883202324M | 34,98,000/- | 17.04.2023 |
| | एकुण - | | 34,98,000/- | |

तसेच इतर देय रक्कमा खालीलप्रमाणे जमा केल्या आहेत.

| अ.क्र. | प्रकार | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| 1 | सर्वेक्षण शुल्क | 5,000/- | SBI Branch Sillod DD No.664141, दिनांक 19.04.2023 |
| 2 | मुद्रांक शुल्क (सर्वोच्च बोलीची रक्कम 10 लाखापर्यंत असल्यास 0.1% व 10 लाखापेक्षा जास्त असल्यास 0.2%) | 6,996/- | चलन क्र. MH000704730202324M दिनांक 17.04.2023 |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | आयकर शुल्क 2.06% (TCS) | 72,059/- | SBI Branch Silod No.664140, दिनांक 19.04.2023 |
| 4 | अनामत रक्कम (हातच्या किमतीच्या 20 % बँक गॅरंटीच्या स्वरुपात) | 6,99,600/- | SBI IFB Aurangabad BG No. -0683423BG0000157, दिनांक 25.04.2023 |
| 5 | जिल्हा खनिज प्रतिष्ठाणची रक्कम (सर्वोच्च बोलीच्या 10%) | 3,49,800/- | दिनांक 19.04.2023 अन्वये एसबीआय,शाखा मोंढा औरंगाबाद |
| 6 | पर्यावरण शुल्क देकार रकमेच्या २% किंवा पर्यावरण अनुमतीमध्येय नमुद EMP Budget यापैकी जे जास्त असेल ती बँक गॅरंटीच्या स्वरुपात | 69,960/- | SBI IFB Aurangabad BG No. -0683423BG0000158, दिनांक 25.04.2023 |
| 7 | भुपृष्ठ भाडे (9000/- रूपये प्रति हेक्टर) | 14,850/- | चलन क्र.MH000702883202324M दिनांक 17.04.2023 |

त्याअर्थी मी, जिल्हाधिकारी औरंगाबाद मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून मुख्याधिकारी, नगर परिषद, सिल्लोड ता.सिल्लोड जि.औरंगाबाद यांना मौजे कोटनांद्रा ता.सिल्लोड जि.औरंगाबाद येथील पुर्णा नदी पात्रातील 5830 ब्रास वाळूचे उत्खनन केवळ मनुष्य बळाच्या सहाय्याने तसेच पर्यावरण अनुमतीमध्ये नमुद केलेल्या कालावधीपर्यंत अर्थात दिनांक 09 जुन, पर्यंत उत्खनन करता येईल. दिनांक 10 जून ते 30 सप्टेंबर या पावसाळ्याच्या कालावधीमध्ये वाळू/रेतीचे उत्खनन करता येणार नाही) दिनांक 30 सप्टेंबर, 2023 या कालाधीत पर्यंत वाहतूक करता येईल.

महसुल व वन विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक गौखनि-10/1021/प्र.क्र. 82/ख-1, दिनांक 28.01.2022 व शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. गौखनि-10/1222/प्र.क्र. 82/ख-1 दिनांक 19.04.2023 मधील अटी व शर्तीचे पालन करावे.

राज्य पर्यावरण विशेषज्ञ समिती यांनी दिनांक 03.03.2023 रोजीच्या बैठकीमध्ये मान्यतेअंती दिलेली पर्यावरण अनुमती व त्यातील नमुद अटी व शर्तीचे पालन करावे.

राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण समिती यांनी दिनांक 09.03.2023 रोजी वाळू लिलाव उत्खनन व वाहतूक करिता दिलेली अंतीम पर्यावरण मान्यतेतील अटी व शर्तीचे पालन करावे. मौजे कोटनांद्रा ता.सिल्लोड वाळू घाटातून वाळूची अवैधरित्या वाहतूक होणार नाही याची दक्षता घ्यावी. शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे खालील अटी व शर्तीचे पालन करणेच्या अटीवर वर नमूद केलेल्या वाळूघाटावरून वाळूचे उत्खनन व वाहतूक करणेस या आदेशाव्दारे मान्यता देण्यात येत असून सदर आदेशाचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यास याची सर्वस्वी जबाबदारी मुख्याधिकारी, नगर परिषद सिल्लोड ता. सिल्लोड जि.औरंगाबाद यांची राहील.

मुख्याधिकारी, नगर परिषद सिल्लोड ता. सिल्लोड जि.औरंगाबाद यांना शासनासोबत नोंदणीकृत करारनामा तात्काळ करणे बंधनकारक आहे.

**:: अटी व शर्ती ::**

१ पर्यावरण विभाग, मुंबई SEIAA या समितीच्या अनुक्रमे दिनांक 28.12.2022 व दिनांक 03.03.2023 रोजी झालेल्या बैठक क्र.237 व 257 मध्ये प्रदान केलेल्या मान्यतेनुसार सदर समितीने दिनांक 09 मार्च, 2023 रोजी निर्गमित केलेल्या पर्यावरण अनुमतीमधील सर्व अटी, शर्ती व निर्देशांचे पालन करणे शासकीय यंत्रणेस बंधनकारक राहील. शासकीय यंत्रणेने पर्यावरण अनुमतीमधील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास वाळू/रेतीगट रद्द करण्याबरोबरच वाळू/रेतीगटाची अनामत रक्कम, बँक गॅरंटी जप्त करण्यात येईल तसेच त्याच्याविरुध्द पर्यावरण संरक्षण कायदा, 1986 मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

2. वाळू/रेतीगटात अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत, वाळू/रेतीगटामधील वाळू मातीमिश्रित आहे किंवा कसे याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणेची राहील. वाळू/रेतीगटाचा ताबा घेऊन संबंधित यंत्रणेने वाळूचे उत्खनन केल्यानंतर यासंबंधीची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच वाळू/रेतीगट बदलून देण्याची किंवा वाळू/रेती घाटापोटी शासनजमा केलेल्या रकमेपैकी प्रमाणशीर रक्कम संबंधित यंत्रणेस परत करण्याच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.
3. शासकीय यंत्रणेला नदीपात्रातून/नाल्यातून वाळू/रेती उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्या क्षेत्रातून वाळू/रेती उत्खनन करताना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी शासकीय यंत्रणेने घ्यावयाची आहे.
4. शासकीय यंत्रणेने गावकऱ्यांच्या निस्तार हक्कास बाधा पोहोचविता कामा नये.

5. शासकीय यंत्रणेने वाळू/रेतीचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या वाळू/रेतीबाबतची दैनंदिन हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरीक्षक, महसूल अधिकारी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरीक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

6. शासकीय यंत्रणेस वाळूची/रेतीची वाहतूक करण्यासाठी परवाना द्यावयाचा असल्यास त्याने सहकारी संस्था/संस्थांना प्राधान्य दिले पाहिजे.

7. वाळू/रेतीची वाहतूक करतांना वाहनातील वाळू/रेती प्लॅस्टीक पेपरने/ताडपत्रीने आच्छादित करुनच वाळूची/रेतीची वाहतूक करणे बंधनकारक आहे. अशी वाहतूक न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

8. शासकीय यंत्रणेने त्यांच्या लिलावगटातील वाळू/रेतीची वाहतूक करणा-या वाहनात त्याच्या वाहन क्षमते इतक्याच परिमाणाची वाहतूक करावी.

9. वाहन क्षमतेपेक्षा अधिक परिमाणाची वाळू/रेती वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण वाळू /रेती अवैध आहे असे समजून त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतूकीबाबत मोटर वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. दंडनीय कारवाईबरोबरच जप्त केलेल्या वाळू/रेतीचा लिलाव करण्यात येईल.

10. वाळू/रेतीचे उत्खनन करताना अथवा वाहतूक करतांना अपघात झाल्यास शासकीय यंत्रणेने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस स्टेशनला देणे बंधनकारक राहील.

11. शासकीय यंत्रणेस नियमात नमूद केल्याप्रमाणे अटी, शर्ती व निर्देशांचे तसेच गौण खनिज उत्खनन नियमातील तरतुदीनुसार असलेले नियम (संबंधित विभागास लागू असलेले नियम) आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील तरतुदीनुसार लागू असलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे शासकीय यंत्रणेस वाळू/रेतीचा पूर्ण उपयोग गौण खनिज म्हणूनच केला पाहिजे.

12. वाळू/रेतीचे उत्खनन करतेवेळी जर काही प्रमुख खनिज आढळून आल्यास शासकीय यंत्रणेने मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद, जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे सात दिवसांत कळविले पाहिजे.

13. मंजूर परिमाणापेक्षा अधिक वाळू/रेतीसाठा वाळू/रेतीगटात असल्यास त्यावर शासकीय यंत्रणेचा कोणताही अधिकार राहणार नाही व मंजूर परिमाणापेक्षा अधिक उत्खनन करण्यास शासकीय यंत्रणेस परवानगी देता येणार नाही.

14. शासकीय यंत्रणेस दिलेल्या क्षेत्रातून करारात नमूद केलेल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनांच्या सहाय्यानेच वाळूचे/रेतीचे उत्खनन करण्याची जबाबदारी शासकीय यंत्रणेची राहील. वाळू/रेतीगटात अपेक्षित साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळू/रेतीगटात पाणी आहे, वाळू/रेतीगटामधील वाळू मातीमिश्रीत आहे अशा तसेच मानवी वा नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही व वाळू/रेतीगट बदलून दिला जाणार नाही.

15. शासकीय यंत्रणेस नदीपात्रामध्ये वाळू/रेती वाहतूकीसाठी मोठी वाहने नेता येणार नाहीत. शासकीय यंत्रणेने वाळू/रेतीगटाच्या नजीकच्या मुख्य रस्त्यावर डेपो तयार करुन वाळू/रेतीगटामधून उत्खनन केलेली वाळू/रेती सदर डेपोमध्ये साठवणूक करावी. डेपोपर्यंतच्या वाळू/रेती वाहतूकीसाठी ट्रॅक्टर, ट्रॉलीचा वापर करावा. वाळू डेपोमध्ये सीसीटीव्ही लावणे अनिवार्य असून, त्याचे फुटेज दर आठवड्याला संबंधित तहसीलदार यांना सादर करणे अनिवार्य असेल.

16. राज्यस्तरीय पर्यावरण आघात मूल्यांकन प्राधिकरण यांनी दिनांक 03.03.2023 रोजी जिल्ह्यातील वाळू/रेतीगटांना दिनांक 30/09/2023 पर्यंत पर्यावरण अनुमती दिली असली तरी महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांच्याकडील शासन निर्णय क्रमांक : गौखनि-10/1021/प्र.क्र.82/ख-1 दिनांक 28/01/2022 मधील (वाळू/रेती निर्गती सुधारीत धोरण) प्रकरण 5 मधील मुद्दा क्र. 2 नुसार लिलावाचा कालावधी पावसाळ्याच्या कालावधीसह समाविष्ट असेल. दिनांक

**09.06.2023** पर्यंतच वाळू/रेतीचे उत्खनन करणे बंधनकारक आहे. **दिनांक 10 जून ते 30 सप्टेंबर** या पावसाळ्याच्या **कालावधीमध्ये वाळू/रेतीचे उत्खनन करता येणार नाही.** जिल्ह्यातील ई-लिलाव व ई-निविदेद्वारे लिलाव [illegible] वाळू/रेतीगटांचा लिलावाचा कालावधी दिनांक 30 सप्टेंबर, 2023 पर्यंतच राहील. उत्खनन केलेल्या किंवा [illegible] वाळू/रेतीची साठवणूक, लिलाव ज्या अपर जिल्हाधिकाऱ्याने/जिल्हाधिकाऱ्याने केला असेल त्यांच्या [illegible] लागेल व **त्यासाठी अकृषक परवान्यासह आवश्यक जमीन उपलब्ध** करुन घेण्याची जबाबदारी शासकीय [illegible] राहील. वाळू/रेतीगटाची मुदत संपण्यापूर्वी ज्या वाळू/रेतीचे उत्खनन केलेले आहे त्या वाळूच्या/रेतीचा साठा मुदत संपल्यानंतर 10 दिवसांत साठवणूकीच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही तर शासनाच्या मालकीचा होईल. [illegible] वाळूच्या/रेतीच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही.

17. तसेच लिलावांतर्गत वाळू/रेतीच्या उत्खननाचा कालावधी संपल्यानंतर 10 दिवसांची मुदत कोणत्याही परिस्थितीत वाळू/रेतीसाठा करण्यास शासकीय यंत्रणेस परवानगी देता येणार नाही किंवा त्याच्या वाहतूकीसाठी दुय्यम वाहतूक पास देण्यात येणार नाहीत.

18. शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय शासकीय यंत्रणेस ठेका दुसऱ्या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही किंवा दुस-या कोणालाही चालविण्यास देता येणार नाही किंवा भागीदारही घेता येणार नाही.

19. **शासकीय यंत्रणेने** त्यांना मंजूर केलेल्या वाळू/रेतीगटातून जे वाळू/रेतीचे उत्खनन केलं आहे, त्याबाबचे विवरणपत्र **दर महिन्याच्या 10 तारखेच्या आत** संबंधित तहसिलदार व जिल्हाधिकारी औरंगाबादयांना सादर करणे सक्तीचे आहे. **प्रत्यक्षात अशी विवरणपत्रे सादर केली** जात नाहीत असे आढळून येत आहे. त्यामुळे मासिक विवरणपत्र विहित वेळेत सादर करणार नाहीत त्यांचा ठेका रद्द करण्याबाबत तसेच त्यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना असतील.

20. शासकीय यंत्रणेने त्यांच्या क्षेत्रातील ज्या ठिकाणातून वाळू/रेती काढण्याने धूप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतींना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातून वाळूचे स्वत: उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही. अशा प्रकरणी जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचा उत्खनन करण्यास प्रतिबंध करण्याचा निर्णय अंतिम राहील.

21. एकदा अत्युच्च बोली स्विकारुन अंतिम करण्यात आलेल्या लिलावात कोणत्याही परिस्थितीत वाळू/रेती उत्खननाचा कालावधी वाढवून देण्याचा अथवा कोणत्याही कारणास्तव वाळूचा/रेतीचा गट बदलून देण्याची मागणी शासकीय यंत्रणेस करता येणार नाही. उत्खनन केलेल्या वाळूच्या/रेतीच्या वाहतूकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच शासकीय यंत्रणेने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतूकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. तसेच वाहतूकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी शासकीय यंत्रणेची राहील. रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतूकीसाठी बंद आहेत या कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत वाळू/रेती उत्खननाचा कालावधी वाढवून दिला जाणार नाही अथवा रेती/वाळूघाट बदलून दिला जाणार नाही.

22. अवैध वाळू/रेतीसाठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील कलम 48 (7) व (8) नुसार कारवाई करण्यात येईल.

23. शासकीय यंत्रणेने वाळू वाहतूकीसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांची माहिती संबंधित तहसिलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी यांना देण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत वाहनाच्या वहन क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

24. अपर जिल्हाधिकारी/जिल्हाधिकारी यांनी वाळूची वाहतूक करणा-या ट्रकना एकाच प्रकारचा रंग देणे शक्य आहे काय याबाबतची शक्यता तपासून पाहून वाळू वाहतूकीसाठी एकाच प्रकारचा रंग दिलेले ट्रक वापरण्यात येईल का याबाबत चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल.

25. वाळूचे/रेतीचे उत्खनन करताना किंवा ते करण्यामुळे खाजगी क्षेत्रातील कोणतीही हानी / नुकसान झाल्यास त्याची भरपाई करावयाचे दायित्व शासकीय यंत्रणेवर राहील. अशा हानीची/नुकसानीची परिगणना जिल्हाधिकाऱ्याकडून/अपर जिल्हाधिकाऱ्याकडून वा अन्य सक्षम अधिकाऱ्याकडून करण्यात येईल व त्याबाबतचा त्यांचा निर्णय अंतिम राहील व अशी रक्कम जमीन महसूलाच्या थकबाकीच्या वसुलीप्रमाणे संबंधित शासकीय यंत्रणेकडून वसूल करण्यात येईल.

26. शासकीय यंत्रणेने त्यांना मंजूर केलेल्या वाळू/रेतीगटाच्या ठिकाणी फलक लावून, उत्खननक्षेत्राची सीमा निश्चित करून सीमा दर्शविणारे खांब उभारणे अनिवार्य राहील. शासकीय यंत्रणेस मंजूर दिलेल्या क्षेत्राच्या बाहेर वाळू/रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच शासकीय यंत्रणेने जिल्हाधिकारी यांच्या पूर्वपरवानगीने सदर वाळू/रेतीगटाचे कामकाज पाहण्यासाठी नियुक्त केलेल्या उपठेकेदार, व्यवस्थापक व कर्मचारी यांची नावे, पत्ता व आदींचा तपशील दर्शविणारा फलक योग्य ठिकाणी लावणे आवश्यक राहील.

27. मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका (सी) क्र.19628-19629/2009 मध्ये दिनांक 27/02/2012 रोजी दिलेले आदेश तसेच नदीपात्रातील पाणी स्वच्छ व शुध्द राहण्यासाठी व नैसर्गिकरित्या पाण्याचे नदीपात्रात वहन होण्यासाठी वाळू/रेतीगटातून पर्यावरण अनुमतीमध्ये परवानगी दिलेल्या खोलीपर्यंतच शासकीय यंत्रणेस वाळू/रेतीचे उत्खनन करता येईल.

28. नदीपात्रातील वाळू/रेती थराची जाडी सातत्याने राहण्यासाठी बेंच मार्क निश्चित करून बेंच मार्कच्या खाली कोणत्याही परिस्थितीत वाळूचे/रेतीचे उत्खनन करता येणार नाही. निश्चित केलेले बेंच मार्क पडणार नाहीत, तसेच नदीपात्रातील वाळूच्या/रेतीच्या थराच्या आधारे आजूबाजूच्या विहिरींतील पाण्याची पातळी कमी होणार नाही याबाबत योग्य ती दक्षता लिलावधारकाने/निविदाधारकाने घेणे आवश्यक राहील.

29. शासकीय यंत्रणेस लिलावात मंजूर केलेल्या वाळू/रेती साठ्या इतकेच उत्खनन व वाहतूक करण्याचा अधिकार राहील.

30. कोणत्याही रेल्वे पुलाच्या व रस्ते पुलाच्या कोणत्याही बाजूने 600 मीटर्स (2000 फूट) अंतराच्या आत वाळूचे/रेतीचे उत्खनन करता येणार नाही.

31. कोल्हापूर पद्धतीचे बंधारे असलेल्या ठिकाणी पाटबंधारे विभाग/विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे शासकीय यंत्रणेस आवश्यक असेल.

32. वाळू/रेतीचे उत्खनन सकाळी 06.00 ते सायंकाळी 06.00 या कालावधीतच करता येईल. या कालावधीव्यतिरिक्तच्या काळात केलेले उत्खनन अवैध समजून कारवाई करण्यात येईल.

33. सार्वजनिक पाणवठा/पाणीपुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून 100 मीटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढ्या अंतरापलीकडे उत्खनन करणे आवश्यक राहील.

34. रस्ते/पायवाट म्हणून वापरण्यात येणाऱ्या जमिनीतून वाळू/रेती काढता येणार नाही.

35. वाळू/रेती उत्खननासाठी लिलाव किंवा परवाना देण्यामागे वाणिज्यिक किंवा महसूल मिळविणे हा एकमेव उद्देश नसून, विकास कामासाठी आवश्यक वाळू/रेती उपलब्ध व्हावी हा प्रमुख उद्देश आहे. तसेच नदीपात्रातील वाळू/रेती साठल्याने आजूबाजूच्या परिसरात पूरसदृश्य परिस्थिती उद्भवू नये म्हणून वाळूचे/रेतीचे उत्खनन केले जाते. शासकीय यंत्रणेस लिलाव मंजूर केल्यानंतर किंवा परवाना दिल्यानंतर शासकीय यंत्रणेने वाळू/रेतीगटाचा ताबा दिल्याच्या दिनांकापासून एका आठवड्याच्या आत वाळू/रेती उत्खनन सुरु करणे आवश्यक राहील.

36. नदीपात्रात निश्चित केलेल्या वाळू/रेतीगटातून वाळू/रेतीचे उत्खनन अयांत्रिकी पध्दतीने (Manual Method) करावे लागेल. नदीपात्रातील वाळू/रेती उत्खननासाठी तसेच नदीपात्रातील वाळू/रेती वाहनात भरण्यासाठी पोकलेन, जेसीबी, सक्शन बोट, इत्यादी प्रकारच्या कोणत्याही यांत्रिक साधनांचा वापर अनुज्ञेय नाही.

37. ई-निविदा/ई-लिलावात भाग घेणा-या व्यक्ती/संस्था/संस्थांनी वाळू/रेतीगट पाण्याखाली आहे किंवा कसे याबाबत शहानिशा करून वाळू/रेतीगट लिलावात घ्यावा. तसेच पाण्याखालील वाळू/रेतीगटामध्ये वाळू/रेतीच्या उत्खननासाठी सक्शन बोट अथवा इतर यंत्राने वाळू उत्खनन करण्याची परवानगी देण्यात येणार नाही. अशा परिस्थितीमध्ये, लिलाव घेतल्यास सर्वस्वी जबाबदारी ही शासकीय यंत्रणेची असेल. याकरिता शासकीय यंत्रणेस शासनाकडे लिलावाच्या रकमेचा परताव्याची मागणी करता येणार नाही किंवा वाळू/रेतीगट बदलून देता येणार नाही.

38. ग्रामपंचायतीने वाळूच्या अवैध उत्खननास आळा घालण्यासाठी शासकीय यंत्रणेमार्फत लिलावाच्या अटी, शर्ती व निर्देशांप्रमाणे उत्खनन होत आहे किंवा कसे याची पाहणी करणे व अटी, शर्ती व निर्देशांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित तहसीलदार व जिल्हाधिकारी यांना त्यासंबंधीची माहिती देणे आवश्यक राहील.

39. पर्यावरण अनुमतीमध्ये परवानगी दिलेल्या खोलीपेक्षा जास्त खोल उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास लिलावधारक/निविदाधारकांकडून घेण्यात आलेली अनामत रक्कम व बँक गॅरंटी जप्त करण्यात येवून लिलाव/निविदा परवाना रद्द करण्यात येईल. तसेच असे उत्खनन अवैध ठरवून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 मधील कलम 48 (7) व (8) मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

40. अवैध वाळू/रेती उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणांमध्ये संबंधित शासकीय यंत्रणा दोषी आढळल्यास त्यांच्याविरुध्द प्रचलित नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

41. प्रचलित नियमानुसार कारवाई करताना संबंधिताविरुध्द भारतीय दंड विधी संहिता कलम 34,114,379,392,393,394,396 इत्यादी कलमांतर्गत गुन्हा दाखल करणे, तसेच खाण व खनिज (विकास आणि नियमन) कायदा, 1957 नुसार कलम 21 नुसार गुन्हा नोंद करणे, महाराष्ट्र जमीन महसूल सं०ता 1966 मधील कलम 48 (7) मधील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करणे व कलम 48 (8) मधील तरतुदीनुसार वाळू/रेती उत्खननासाठी वापरलेली यंत्रसामुग्री व वाहतूकीसाठी वापरलेली वाहने जप्त करणे, अवैध उत्खनन केलेली वाळू/रेती जप्त करणे, इत्यादी कारवाई करण्यात येईल.

42. वाळूच्या/रेतीच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणात वाळूच्या/रेतीच्या बाजारभावाच्या आधारे दंडाची रक्कम आकारण्यात येईल.

43. वाळूचे/रेतीचे अवैध उत्खनन/वाहतूकीच्या अनुषंगाने कारवाई करतांना महसूल अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर हल्ले होत असल्याचे निदर्शनास आल्यास किंवा अशा ठिकाणी संघटित गुन्हेगारीचे प्रकार आढळून आल्यास अशा संघटित गुन्हेगारीविरुध्द महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषध द्रव्येविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम 1981 अधिनियमान्वये कारवाई करण्यात येईल.

44. शासकीय यंत्रणेने पर्यावरण अनुमतीमधील अटी, शर्ती व निर्देशांचे तसेच पर्यावरणविषयक नियमातील तरतुदींचे पालन करणे बंधनकारक असेल. सदर तरतुदींचे उल्लंघन झाल्यास ते पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, 1986 मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील.

45. संबंधित शासकीय यंत्रणेला संबंधित तहसीलदारांनी प्रमाणित करुन दिलेली भेटवही ठेवणे बंधनकारक असेल. सदर भेटवही महसूल अधिकारी / कर्मचारी यांना तपासणीवेळी दाखवणे बंधनकारक राहील.

46. प्रत्येक वाळू/रेतीगटाच्या ठिकाणी 24x7 छायाचित्रण होण्यासाठी शासकीय यंत्रणे मार्फत CCTV बसविण्यात यावेत. यापैकी किमान एक CCTV कॅमेरा वाहतूकीच्या साधनात ज्या ठिकाणी वाळू/रेती भरण्यात येते त्या ठिकाणी बसविण्यात

द्यावा व वाळू/रेतीगटातील वाळू/रेतीची वाहतूक करणारी सर्व वाहने गावातील ज्या ठिकाणावरून ये-जा करतात त्या ठिकाणच्या छायाचित्रणासाठी वापरण्यात यावा. वाळू/रेतीगटाच्या ठिकाणी बसविलेल्या CCTV ची किंमत लिलावधारकांना/निविदाधारकांना सोसणे आवश्यक राहील.

47. शासकीय यंत्रणेने बसविलेल्या CCTV चा Address जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त व शासनाच्या महसूल व वन विभागाकडे देणे आवश्यक राहील. शासकीय यंत्रणेने वाळू/रेती उत्खनन व वाहतूकीची छायाचित्रण असलेली सीडी दर 15 दिवसांनी तहसिलदार कार्यालयात जमा करणे अनिवार्य राहील. तहसिलदार व उपविभागीय अधिकारी अशा सीडीची तपासणी करतील. अशा तपासणीत CCTV कॅमेरा काही काळासाठी बंद असल्याचे निदर्शनास आल्यास मंजूर साठा व वाळू/रेती उत्खननासाठी उपलब्ध दिवस यानुसार दर दिवशी करावयाचे उत्खनन विचारात घेवून, जेवढे दिवस CCTV कॅमेरा बंद होता, तेवढे दिवस सरासरी उत्खनन केले असे गृहीत धरुन लिलावाच्या रकमेनुसार प्रति ब्रास रक्कम परिगणित करुन त्या दराने CCTV कॅमेरा बंद असलेल्या कालावधीत उत्खनन केलेल्या वाळू/रेतीच्या रकमेएवढी दंडात्मक रक्कम शासकीय यंत्रणेडून वसूल करण्यात येईल. एखादया दिवशी कितीही कालावधीसाठी CCTV बंद असला तरीही पूर्ण दिवसासाठी CCTV बंद असल्याचे समजून वरीलप्रमाणे दंडात्मक रक्कमेची आकारणी व वसुली करण्यात येईल.

48. वाळू घाटाचे आदेश निर्गमित केल्यानंतर शासकीय यंत्रणेने वाळू/रेतीगटाचा ताबा सात दिवसांच्या आत घेतला पाहिजे, शासकीय यंत्रणेस वाळू/रेतीगटाचा ताबा देतांना तसेच त्याच्याकडून ताबा परत घेताना तहसीलदार किंवा जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्यासमक्ष पंचनामा करण्यात यावा व त्याचे व्हिडीओचित्रिकरण करण्यात यावे व त्याची सी.डी. तहसिलदारांमार्फत जिल्हाधिकारी यांचेकडे ताबा दिल्याच्या अहवालासोबत जमा करावी व वाळू/रेतीगटाचा ताबा घेतल्याच्या दिनांकापासून शासकीय यंत्रणेने एक आठवड्याच्या आत उत्खनन सुरु करणे आवश्यक राहील.

49. मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.4830/2010 मधील दिनांक 26/10/2010 रोजीच्या निर्णयान्वये ठरवून दिलेल्या निकषानुसार, वाळू/रेतीगटाशी संबंधित तहसीलदार यांनी उत्खननाचा अहवाल प्रत्येक आठवड्याला जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांना सादर करणे आवश्यक आहे. शासकीय यंत्रणेने स्वत:हून उत्खनन बंद ठेवलेल्या दिवशी तहसिलदार यांनी वाळू/रेती गटाचे निरीक्षण करावे व त्यांचा अहवाल जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांना सादर करणे आवश्यक आहे. सबब, शासकीय यंत्रणेस सदर बाबीची नोंद घेणे आवश्यक राहील.

50. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा विभागाने विहित केलेल्या मर्यादेच्या पलीकडे असलेल्या क्षेत्रातून वाळू/रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच इतर व्यक्तींच्या खाजगी मालकीच्या जमिनीतून, अशा जमिनी शासकीय यंत्रणेस आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असल्या तरी त्या ठिकाणाहून वाळू/रेती काढता येणार नाही. तसेच रस्ते, पायवाट म्हणून वापरण्यात येणाऱ्या जमिनीतून वाळू/रेती काढता येणार नाही. शासकीय यंत्रणेस मंजूर क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रात वाळूचे/रेतीचे उत्खनन करता येणार नाही.

51. खालील कारणास्तव लिलावाची रक्कम परत करण्यात येणार नाही :- वाळू/रेती निर्गती धोरणातील अटी व शर्ती तसेच निविदा सूचनेतील अटी, शर्ती व निर्देशानुसार शासकीय यंत्रणेस वाळू/रेतीगटात अपेक्षित वाळू/रेतीसाठा आहे किंवा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच, परवानगी दिलेल्या साधनांच्या सहाय्याने वाळूचे/रेतीचे उत्खनन करण्याची जबाबदारी शासकीय यंत्रणेची आहे. त्यामुळे वाळू/रेतीस्थळात अपेक्षित वाळू/ रेतीसाठा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध नाहोत, वाळू/रेतीगटात पाणी आहे, मातीमिश्रीत वाळू/रेती आहे, वाळू/रेती उत्खननासाठी सक्शन पंपाची परवानगी मिळाली नाही अशा कारणांस्तव लिलावाच्या रकमेचा परतावा अनुज्ञेय असणार नाही.

52. वाळू/रेती शासकीय यंत्रणेने पावतीमध्ये नमुद परिमाणापेक्षा अधिक परिमाणाची वाळू/रेती वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण गौण खनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल व त्यासोबतच तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतूकीबाबत मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. दंडनीय कारवाईबरोबरच जप्त केलेल्या वाळूचा/रेतीचा लिलाव करण्यात येईल.

53. शासकीय यंत्रणेने वाळू/रेतीचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या वाळू/रेती बाबतची दैनंदिन हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे लिलावधारकाने दर महिन्याच्या 10 तारखेपर्यंत संबंधित तहसीलदार यांच्याकडे सादर करणे बंधनकारक आहे. तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरीक्षक, महसूल अधिकारी अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच अपर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी (महसूल), उपविभागीय अधिकारी, नायब तहसिलदार व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरीक्षण करणा-या अधिका-यासाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

54. मंजूर परिमाणापेक्षा अधिक वाळू/रेतीसाठा वाळू/रेतीगटात असल्यास, त्यावर शासकीय यंत्रणेचा कोणताही अधिकार राहणार नाही. मंजूर परिमाणापेक्षा शासकीय यंत्रणेस अधिक उत्खनन करता येणार नाही. मंजूर परिमाणापेक्षा जास्त उत्खनन केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तर नमुद मंजूर वाळू/रेतीसाठ्यापैकी वाळू/रेती कमी भरल्यास त्याची जबाबदारी शासकीय यंत्रणेची राहील.

55. वाळू/रेती उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केलेले असेल त्या क्षेत्रातून वाळू/रेती उत्खनन करतांना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी शासकीय यंत्रणेने घ्यावयाची आहे.

56. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी निकामी वाळूचे/रेतीचे साठलेले ढिग नदीपात्रातील वाळू/रेती उपसल्यामुळे झालेले खड्डे बुजविण्यासाठी उत्खनन/ लिलाव कालावधी संपल्यानंतर उपयोगात आणावे. त्याची जबाबदारी शासकीय यंत्रणेची राहील.

57. शासकीय यंत्रणेस सिल्टेशन (Siltation) अभ्यासाबाबतचा अहवाल वाळू/रेती उत्खननाचा कालावधी संपण्यापूर्वी तज्ञ एजन्सी, जसे - NIO/CWPRS मार्फत करुन त्याचा अहवाल पर्यावरण विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय व उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे सादर करावा लागेल.

58. शासकीय यंत्रणेस संबंधित वाळू/रेतीगटाच्या पर्यावरण अनुमतीतील अटी, शर्तीचे निर्देशांचे अनुपालन करुन तसा अहवाल दर 6 महिन्यांनी पर्यावरण सल्लागार यांच्या मदतीने जिल्हाधिकारी कार्यालय व उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे सादर करावा लागेल.

59 शासकीय यंत्रणेस मंजूर क्षेत्रामध्ये पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, खाणकाम आराखड्याप्रमाणे वाळू/रेतीगट परिसरामध्ये व गावातील वाहतूक रस्त्यावर CPCB Guideline नुसार स्थानिक वन अधिकारी व फलोत्पादन अधिकारी यांच्या मदतीने झाडे लावून हरियाली (Green belt) करावी लागेल.

60. शासकीय यंत्रणेने कासव प्रजनन क्षेत्रात वाळूचे/रेतीचे उत्खनन करु नये.

61. शासकीय यंत्रणेने उत्खननाच्या वेळी Soil Erosion व Silt Management बाबत आवश्यक त्या दक्षता घेणे बंधनकारक राहील.

62. शासकीय यंत्रणेने उत्खननाच्या जागेवर वैद्यकीय प्राथमिक उपचार सुविधा उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

63. शासकीय यंत्रणेने वार्षिक पर्यावरणीय अंकेक्षण अहवाल (Compliance Report) पर्यावरण विभागास सादर करणे शासकीय यंत्रणेस बंधनकारक राहील.

64. शासकीय यंत्रणेने त्यांना मंजूर केलेल्या वाळू/रेतीगटातून केलेल्या वाळूचे/रेतीचे उत्खनन, विक्री व साठा केल्याबाबत दैनंदिन हिशोब ठेवावा. तसेच दर महिन्याच्या 10 तारखेपर्यंत, अगोदरच्या महिन्याचा मासिक अहवाल, जिल्हाधिकारी कार्यालय, खनिकर्म विभाग व तहसिल कार्यालय यांना सादर करणे शासकीय यंत्रणेस बंधनकारक राहील. सलग दोन महिने असा अहवाल प्राप्त न झाल्यास अथवा सादर केलेल्या अहवाल चुकीचा आढळून आल्यास सदरच्या वाळू/रेतीगटाचा लिलाव रद्द करुन शासनाची दिशाभूल केल्यामुळे नियमानुसार उचित कार्यवाही अनुसरली जाईल.

65. शासकीय यंत्रणेस लिलावाच्या अटी, शर्ती व निर्देश, राज्यस्तरीय तज्ञ मूल्यांकन पर्यावरण समिती व राज्यस्तरीय पर्यावरण आघात निर्धारण प्राधिकरणांकडील अनुक्रमे दिनांक 28.12.2022 व दिनांक 03.03.2023 रोजी झालेल्या बैठक क्र.237 व 257 दिनांक 09.03.2023 रोजीची पर्यावरण अनुमती, भारत राजपत्र, पर्यावरण वन और जलवायु परिवर्तन मंत्रालय, अधिसूचना, दिनांक 14 सप्टेंबर 2006, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक : गौखनि 10/1021/प्र.क्र.82/ख-1 दिनांक 28/01/2022, Sustainable Sand Mining Guidelines 2016, Enforcement and Monitoriong Guidelines for Sand Mining January 2020 अटी व शर्तीस अधीन राहून व महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, 2013 मधील नियम 70 मधील तरतुदी तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 यामधील तरतुदींनुसार लागू असलेल्या तरतुदींचे व नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे वाळू/रेतीचा पूर्ण उपयोग गौण खनिज

म्हणूनच केला पाहिजे. अवैध वाळू/रेती उत्खनन/साठा/वाहतूक प्रकरणात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील 48 (7) व (8) नुसार कारवाई करण्यात येईल.

66. शासकीय यंत्रणेस वाळू/रेती उत्खनन करतांना होणाऱ्या प्रदुषणासंबंधी प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

67. मा. न्यायालयाने व शासनाने वाळू/रेतीगटाबाबत काही आदेश/निर्णय दिल्यास सदर आदेश/ निर्णय शासकीय यंत्रणेवर बंधनकारक राहतील व मा. न्यायालयाच्या आदेश/ निर्णयानुसार पुढील कार्यवाही करावी लागेल.

68. वाळू/रेती उत्खननातील अडचणी व तक्रारीसंदर्भात निर्णय घेण्याचे अधिकार जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीस राहतील. त्याची कार्यपद्धती शासन निर्णय क्र. गौखनि 10/1021/प्र.क्र.82/ख-1 दिनांक 28/01/2022, मधील प्रकरण अकरा नुसार राहील.

69. लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत ठेका रद्द केल्यास किंवा शासकीय यंत्रणेस वाळू/रेती उत्खनन करण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही.

70. शासकीय यंत्रणेने त्यांना मंजूर केलेल्या क्षेत्रामधील/क्षेत्रालगतच्या वन्य प्राण्यांच्या/पक्षांच्या अस्तित्वास तसेच त्यांच्या निवासास इजा पोहचणार नाही याची दक्षता घ्यावी.

71 शासकीय यंत्रणेने वाळू उत्खनन करतांना मा. सर्वोच्च न्यायालय तसेच मा. हरित लवाद यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन करणे आवश्यक आहे.

72 शासकीय यंत्रणेने नदीचा प्रवाह, गती, गढूळता यांच्या स्वरुपात बदल होणार नाही याची दक्षता घ्यावी, तसेच वाळूचे उत्खनन करतांना नदीतील मातीच्या गुणधर्मावर परिणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी.

73 वाळू/रेती वाहतूक करणारी वाहने रहिवासी भागात उभी करु नयेत. तसेच शासकीय यंत्रणेने कामगारांसाठी निवासाची सोय, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा (कोविड-19 प्रतिबंधक उपाययोजनांसह) उपलब्ध करुन दिल्या पाहिजे.

74 वाळूची/रेतीची वाहतूक करणा-या वाहनांचे सक्षम प्राधिकरणाने दिलेले Pollution Under Controll (PUC) प्रमाणपत्र वाहनासोबत बाळगणे आवश्यक आहे.

75 शासकीय यंत्रणेने वाळू/रेती उत्खननामुळे खराब झालेल्या पाण्यावर MoEFCC/MPCB च्या तरतुदींनुसार प्रक्रिया करावी.

76 शासकीय यंत्रणेने मंजूर क्षेत्रातील Ambient Air Quality Monitoring माहे फेब्रुवारी, एप्रिल व मे महिन्यात करावी.

77 शासकीय यंत्रणेने CPCB च्या नियमानुसार Noise Level Controlling करावे.

78 शासकीय यंत्रणेने त्याला मंजूर संपूर्ण क्षेत्रावर प्रकाश पडेल अशा रितीने लाईटची व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसेच संपूर्ण क्षेत्र तसेच वाहनांची ये-जा दिसेल अशा पध्दतीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवून सदर कॅमेऱ्याचे फुटेज मासिक अहवालासोबत तहसिल व जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

79 शासकीय यंत्रणेने वन्यजीव आवास क्षेत्रासंबंधीच्या नियमांचे उल्लंघन करु नये.

80 शासकीय यंत्रणेने त्यांना मंजूर क्षेत्रात जाण्या-येण्यासाठी एकच मार्ग/रस्ता ठेऊन इतर सर्व मार्ग/छोटे रस्ते इ. बॅरिकेड्सने बंद करावेत.

81 शासकीय यंत्रणेने त्यांच्या लिलावक्षेत्रात येणाऱ्या प्रत्येक वाहनाची नोंदणी संबंधित तहसिलदार यांच्याकडे करावी.

82 वाळूचे/रेतीचे अनधिकृत उत्खनन व वाहतूक टाळण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत वेळोवेळी देण्यात येणा-या निर्देशांचे पालन शासकीय यंत्रणेस करणे बंधनकारक राहील. तसेच वाळू वाहतूक करणारे सर्व वाहनांना GPS प्रणाली बसवणे बंधनकारक आहे.

83 शासनाने दिनांक 16.10.2015 च्या परिपत्रकान्वये कळविल्यानुसार ज्यांना वाळू/रेती लिलाव मंजूर होईल त्यांचेकडून लिलावाची सर्व रक्कम शासनजमा केल्यानंतर शासकीय यंत्रणेच्या नावे पर्यावरण अनुमती वर्ग करण्याचा प्रस्ताव राज्यस्तरीय समिती शासनास सादर करील.

84 वाळूचे/रेतीचे अनधिकृत उत्खनन व वाहतूक टाळण्यासाठी केंद्र शासन/राज्य शासन/जिल्हा प्रशासनामार्फत वेळोवेळी देण्यात येणारे निर्देशांचे पालन शासकीय यंत्रणेस करणे बंधनकारक राहील.

85 केंद्र शासनाच्या Enforcement & Monitoring Guidelines 2020, महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक 28/01/2022; शासनाने वेळोवेळी दिलेले निर्देश व पर्यावरण समितीने दिलेल्या पर्यावरण अनुमतीमधील अटी, शर्ती व निर्देश, तरतुदी लिलावधारकावर/ निविदाधारकावर बंधनकारक राहतील.

86 मा. सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली यांनी दिपककुमार प्रकरणातील (SLP(C)NO.19628-19629 of 2009) आदेश दिनांक 27/02/2012 व मा. राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरण, नवी दिल्ली यांच्याकडील मूळ अर्ज क्र. 171/2013 व 173/2018 मधील दिनांक 05/08/2013 रोजीच्या आदेशाचे पालन करणे शासकीय यंत्रणास अनिवार्य राहील.

87 मा. राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरण, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या मूळ अर्ज क्र. 363/2015 व 366/2015 व 368/2015 मध्ये त्यांनी दिनांक 19/04/2017 रोजी दिलेल्या आदेशामध्ये मा. न्यायाधिकरणाच्या पूर्वमान्यतेशिवाय सक्शन पंपाद्वारे वाळू/रेती उत्खननास परवानगी देण्यास राज्य शासनास प्रतिबंध केलेला आहे. त्यामुळे शासकीय यंत्रणेस सक्शन पंपाद्वारे वाळू/रेतीचे उत्खनन करता येणार नाही वा तशी परवानगी त्यांना देता येणार नाही.

88 पर्यावरण अनुमतीमधील सर्व अटी व शर्ती शासकीय यंत्रणेवर लागू असतील. सदर पर्यावरण अनुमतीतील संबंधित सर्व अटी शर्ती सोबत जोडण्यात आलेल्या आहेत.

89 राज्यस्तरीय तज्ञ मूल्यांकन पर्यावरण समिती व (SEAC) राज्यस्तरीय पर्यावरण आघात मूल्यांकन प्राधिकरण (SEIAA) यांचेकडील अनुक्रमे दिनांक 28.12.2022 व दिनांक 03.03.2023 रोजी झालेल्या बैठक क्र. 237 व 257 दिनांक 09.03.2023 रोजीच्या पर्यावरण अनुमतीमधील संपूर्ण अटी, शर्ती व निर्देशांचे पालन करणे शासकीय यंत्रणेवर बंधनकारक राहील.

90 शासनाने विहीत केलेल्या कार्यपध्दीनुसार लिलाव करण्यात आलेल्या वाळूघाटाबाबत कालांतराने लिलावाच्या अटी व शर्तीचे उल्लंघन करून वाळूचे उत्खनन होते. अवैध व नियमबाहय वाळू उत्खननामुळे नदीकाठच्या गावातील पिण्याच्या व शेतीच्या पाण्यावर विपरीत परीणाम होतो. वाळूच्या वाहतुकीमुळे नदीकाठच्या शेतीच्या रस्त्यांची हानी होते. अशा स्वरूपाच्या तक्रारी विविध व्यक्ती व संस्थाकडून करण्यात येतात. अशा तक्रारींची दखल घेवून त्या संदर्भात चौकशी करून चौकशीच्या निष्कर्षानुसार कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पुढील अधिका-यांचा समावेश असलेली समिती राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | जिल्हाधिकारी | - | अध्यक्ष |
| 2. | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद | - | सदस्य |
| 3. | पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त | - | सदस्य |
| 4 | अपर जिल्हाधिकारी | - | सदस्य |
| 5. | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | - | सदस्य |
| 6. | कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग | - | सदस्य |
| 7. | उपवन संरक्षक | - | सदस्य |
| 8. | प्रादेशिक परिवहन अधिकारी | - | सदस्य |
| 9. | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ | - | सदस्य |
| 10. | वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण यंत्रणा | - | सदस्य |
| 11. | जिल्हा खनिकर्म अधिकारी औरंगाबाद | - | सदस्य सचिव |

91. शासनाने गौण खनिज उत्खनन व वाहतूकीच्या संगणक प्रणालीसाठी मे. शौर्य टेक्नोसॉफ्ट प्रा. लि. 694/1/2/4, आदर्श नगर, सहकार भवन, दुसरा मजला, हॉटेल उत्सव चौक, सिटी प्राईड सिनेमा, सातारा रोड, पुणे-37 या कंपनी कडील लागू असलेली प्रणाली तसेच तत्संबंधी सर्व अटी, शर्ती व निर्देशांचे पालन करणे बंधनकारक राहील. तसेच वाळू/रेती वाहतूकीसाठी आवश्यक असलेल्या संगणक प्रणालीचा व वाहतूक परवान्याचा प्रति ब्रास रु. 14/- अधिक जीएसटीप्रमाणे शुल्क शासकीय यंत्रणेस मे. शौर्य टेक्नोसॉफ्ट प्रा. लि. यांना द्यावा लागेल.

1.वाळू/रेती शासकीय यंत्रणेला विहित नमुन्यातील वाळू/रेती वाहतूक पास तीन प्रतीमध्ये तहसीलदार यांच्यामार्फत पुरविण्यात येतील. वाहतूक पासची मूळ प्रत वाहनचालकाकडे वाळू/रेती वाहतूक करताना देण्यात यावी. वाहतूक पासमध्ये नमूद केलेल्या ठिकाणी वाळू/रेती उतरुन घेतल्यानंतर वाहनचालकाने मूळ प्रत खरेदीदाराकडे सुपुर्द करावी. वाळू/रेती लिलावधारकाने एक प्रत स्वत: जवळ ठेवावी. उर्वरित एक प्रत तहसीलदार यांच्याकडे जमा करावी. वाळू/रेती वाहतूक करतेवेळी वाहतूक पास वाहनासोबत नसल्यास त्या वाहनातील वाळू/रेती बेकायदेशीर व अनधिकृत असल्याचे समजले जाईल आणि त्याबाबत लागू असलेल्या कायद्याच्या प्रचलित तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

2. शासकीय यंत्रणेने वाहन चालकाकडे वाहतूक परवाना सुपूर्द करण्यापूर्वी त्याची नोंदणी महाखनिज प्रणाली मध्ये करणे आवश्यक आहे. महाखनिज ॲपसाठी त्यांनी जिल्हा खनिकर्म अधिकारी औरंगाबाद यांच्याकडून आपले मोबाईल क्रमांक महाखनिज प्रणालीवर नोंदणी करुन घ्यावेत.

3. शासकीय यंत्रणेने e-TP तयार करताना वाहनाची नोंदणी महाखनिज प्रणालीमध्ये करणे बंधनकारक राहील, त्यामध्ये वाहन मालकाचे/चालकाचे नाव, त्याचा दूरध्वनी क्रमांक इ. माहिती अचूक टाकणे आवश्यक राहील. त्यामध्ये तफावत आढळल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल.

4. शासकीय यंत्रणेने अधिकृत वाळू/रेतीगटातून वाळू/रेतीचे उत्खनन करुन प्रत्येक वाहनामधील वाळू/रेतीचे परिमाण, वाहन क्रमांक, वाहन अधिकृत रेती/वाळूगटापासून ते जाण्याचे ठिकाण या दोन ठिकाणांमधील अंतर इत्यादी तपशिल तपासून परिमाणानुसार बारकोड स्कॅन करून महाखनिज ॲपद्वारे eTP क्रमांक तयार करणे अनिवार्य असेल. प्रणालीकडून शासकीय यंत्रणेस नोंदणीकृत मोबाईलवर त्याने केलेल्या विनंतीनुसार त्यास महाखनिज ॲपव्दारे eTP क्रमांक प्राप्त होईल. सदर eTP क्रमांक बारकोड पावतीवर नमुद करावा लागेल. eTP क्रमांकप्राप्त झाल्याशिवाय व ते वाहतूक पासेस वर नमुद केल्याशिवाय शासकीय यंत्रणेस वाळू/रेतीची वाहतूक करता येणार नाही. eTP क्रमांकाशिवाय व वाहतूक पासेस शिवाय वाहतूक केल्यास ती वाहतूक अवैध ठरुन त्यावर प्रचलित कायदे व लागू असलेल्या धोरणानुसार दंडात्मक कारवाई केली जाईल.

5.वाळू/रेती गटावरुन महामायनिंग प्रमाणालीमध्ये e-TP तयार करणे अनिवार्य आहे. वाळू/रेतीशिवाय इतरत्र बसून e-TP तयार केल्याचे आढळल्यास शासकीय यंत्रणेवर नियमानुसार कारवाई केली जाईल. एखाद्या वाळू/रेती गटावर इंटरनेट/मोबाईल नेटवर्क नसल्यास e-TP तयार करण्यासाठी जवळील नेटवर्क असलेल्या क्षेत्रातून e-TP बनविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून परवानगी घेणे आवश्यक राहील.

6.वाळू/रेतीची वाहतूक करणाऱ्या चालकाकडे प्रमाणित असलेली वैध पावती आणि त्यावरील उक्त e-TP क्रमांकाची माहिती बरोबर नसेल किंवा त्या वाहतुकीचा वैधता कालावधी संपलेली असेल तर अशी वाहतूक अवैध ठरविण्यात येईल.

7.वाहतूक करतेवेळी वाहनातील परिमाण व वाहतूक पास (e-TP) वर नमूद केलेले परिमाण यामध्ये तफावत आढळून आल्यास सदर वाहनावर दंडात्मक कारवाई केली जाईल.

8.वाळू/रेतीची वाहतूक करणा-या वाहनचालकाकडे e-TP क्रमांक तयार केलेली वैध बारकोडयुक्त पावती आहे किंवा नाही, याबाबतचे निरीक्षण संबंधित महसूल तथा तपास यंत्रणेकडून केले जाईल. अशा निरीक्षणाच्या वेळी संबंधित वाहनचालकाकडे e-TP क्रमांक तयार केलेली वैध बारकोडयुक्त पावती आढळली नाही किंवा वैध कालावधी संपलेला असेल तर सदर वाळू/रेतीचे उत्खनन/वाहतूक अवैध समजून त्याविरुद्ध कारवाई करण्यात येईल.

9.वाळू/रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहन चालकाकडे वैध बारकोडयुक्त पावती व e-TP क्रमांक आहे किंवा नाही, याबाबतचे निरीक्षण संबंधित जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हा खनिकर्म अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच महसूल यंत्रणेकडून नियुक्त भरारी पथकांकडून अथवा जिल्हाधिकारी नामनिर्देश करतील अशा व्यक्तींकडून केली जाईल. अशा निरीक्षणाच्या वेळी संबंधित वाहनचालकाकडे वैध बारकोडयुक्त पावती व वैध इनव्हाईस नंबर आढळला नाही किंवा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल तर सदर वाळूचे/रेतीचे उत्खनन/वाहतूक अवैध समजून त्याविरुद्ध महाराष्ट्र जमीन महसूल

संहिता, 1966 मधील कलम 48 (7) व (8), महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे) नियम 2017, महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, 2013 आणि शासन निर्णय, महसूल व वन विभाग दिनांक 28/01/2022 व शासन अधिसूचना दिनांक 12/01/2018 मधील निर्धारित तरतुदीनुसार त्यांविरुध्द कारवाई करण्यात येईल.

स्वाक्षरीत/-
(आस्तिक कुमार पाण्डेय, भाप्रसे)
जिल्हाधिकारी औरंगाबाद

प्रत :-

1. मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव.
3. उपविभागीय अधिकारी, सिल्लोड यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.
4. तहसिलदार सिल्लोड यांना कळविण्यात येते की, संबंधित कार्यान्वीत यंत्रणा यांना तालुका तांत्रिक समितीमार्फत वाळू उत्खनन प्रमाणपत्रात दर्शविल्याप्रमाणे त्या ठिकाणची निश्चित जागा दाखवून आदेशाचे दिनांकापासून जास्तीत जास्त सात दिवसात वाळूपट्टयाचा ताबा सुधारित वाळू/रेती निर्गती धोरणात नमुद तरतुदीनुसार दयावा. कार्यान्वीत यंत्रणेकडून सदर आदेशातील अटी व शर्तीचे पालन केले जाते किंवा कसे याची दक्षता घ्यावी. कार्यान्वीत यंत्रणेकडून वाळूपट्टयाचा ताबा दिल्याचा पंचनामा व ताबा पावती या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच कार्यान्वीत यंत्रणेकडून प्रत्येक आठवडयाला केलेल्या वाळू उत्खननाचा अहवाल सादर करावा. महिन्याच्या दुस-या व चौथ्या रविवारी वाळूपट्टयाचे स्थळ निरिक्षण करुन अहवाल सादर करावा. कार्यान्वीत यंत्रणेकडून वाळू स्थळी CCTV कॅमेरे बसविणे आवश्यक असुन यावर सनियंत्रण ठेवणेची जबाबदारी आपली असुन याबाबत आवश्यक ती कार्यवाही करुन वेळोवेळी अहवाल सादर करावा.
5. मुख्याधिकारी, नगर परिषद सिल्लोड ता. सिल्लोड जि.औरंगाबाद

(आस्तिक कुमार पाण्डेय, भाप्रसे)
जिल्हाधिकारी औरंगाबाद